100Rs.

(2)

(१)

# AKOLA MUNICIPAL CORPORATION, AKOLA

## ORDER SHEET

Office of the : **बाजार विभाग महानगरपालिका, अकोला.**

Subject : **म.न.पा. व्यापारी संकुल अशोक नगर, अकोला दुकानदारांकडून करारनामा करणे व अलॉटमेंट लेटर देणे.**

महोदय,

अकोला महानगरपालिका हद्दीतील अशोक नगर भागातील प्लॉट नं.के ६४ शिट क्र. ४८ अकोला येथील जागेत व्यापारी संकुल उभारण्याचे कंत्राट तत्कालीन न.प.ने विकासक श्री चंद्रमणी गेणुजी माने रा. अकोला या विकासकाला दिले होते. त्या संदर्भात नगरपरिषदेने सदरील व्यापारी संकुल उभारते वेळी विकासक श्री चंद्रमणी गेणुजी माने आणि तत्कालीन नगरपरिषद, अकोला यांच्यात झालेल्या दिनांक १५ जानेवारी, २००१ च्या करारानुसार शिफारस केलेल्या व्यापाऱ्यांना न.प.ने आवश्यक ते परवाना शुल्क आकारून निश्चित अटी व शर्तीवर सदरील दुकाने निश्चित कालावधी करिता वापरावयास द्यावयाचे ठरले आहे. विकासकाने एकूण ९ दुकाने बांधली आहे.

विकासक श्री चंद्रमणी गेणुजी माने रा. अकोला यांनी केलेल्या शिफारसीनुसार करारनाम्यातील पार्टी नं. २ला सदरील व्यापारी संकुल मधील दुकान नं. ३ पार्टी नं. २ला **श्री शे. नजीर शे. गफ्फार** रा. अकोला यांना सोबत जोडलेल्या करारनाम्यातील शर्ती व अटीवर देण्यास मंजुरी देण्यास मंजुरी देण्यास हरकत नाही. सोबत अर्जदाराचा अर्ज विकासकाने दिलेले नाहरकत प्रमाणपत्र व करारनाम्याची प्रत सोबत जोडली आहे. करारनाम्यातील अटीनुसार करारनामा केल्यानंतर अलॉटमेंट लेटर देण्यास मंजुरी द्यावी. ही विनंती.

आदेशार्थ सविनय सादर.

मा. आयुक्त

24/12/2003

(जी. एम. पांडे) 24/12/03

मालमत्ता व व्यवस्थापन सहाय्यक

महानगरपालिका, अकोला

(क्र.मा.प)

Scanned with CamScanner

१९/४/०५ मान्यवर,

अहवाल सादर करण्यात येते की, करारनामा करण्यात आला आहे परंतु अलॉटमेंट लेटर देण्यात आले नाही.

तरि दु.क्र.३ चे श्री शे. नजीर शे. गफार यांना अलॉटमेंट लेटर देण्याबाबत आपले आदेश व्हावा पुढील आदेशार्थ सविनय सादर

वसुली लिपीक

बा/अ

आ. उपआयुक्त

21.4.05

INDIA NON JUDICIAL

१०० रु. Rs 100

सत्यमेव जयते

भारत

एक सौ रुपये ONE HUNDRED RUPEES

## करारनामा

पक्ष क्र. १ अकोला महानगरपालिका तर्फे
आयुक्त, महानगरपालिका, अकोला.

पक्ष क्र. २ शे. नजीर शे. गफ्फार .
रा. अकोला.

अकोला महानगरपालिका हद्दीतील नझूल शिट नं. ४८ अ प्लॉट क्र. के ६४ अकोला अकोट रोड ते अशोक नगर रोड अकोला येथील व्यापारी संकुल उभारण्याचे काम तत्कालीन नगरपरिषदेने श्री. चंद्रमणी गणूजी माने रा. अकोला या विकासकाला दिले होते. त्यांनी बांधलेल्या व्यापारी संकुलामध्ये एकंदरीत ९ दुकाने असून या संपुर्ण व्यापारी संकुलाची मालकी अकोला महानगरपालिकेची आहे.

सदरील व्यापारी संकुल उभारणी करण्याचे कंत्राट विकासक श्री. चंद्रमणी गणूजी माने रा. अकोला यांना दि. १०-१०-०१ रोजी देण्याचे निश्चित करण्यात आले. विकासक श्री. चंद्रमणी गणूजी माने व नगरपरिषद यांच्यात दिनांक १५ जानेवारी, २००१ च्या करारनाम्यानुसार विकासकाने शिफारस केलेल्या व्यापाऱ्यांना किंवा व्यक्तिंना सदरील व्यापारी संकुलातील गाळे नगरपरिषद अकोला ने आवश्यक ते परवाना शुल्क आकारून निश्चित अटी व शर्तीवर सदरील दुकाने निश्चित कालावधी करीता वापरावयास द्यावयाची ठरले आहे. विकासक श्री. चंद्रमणी गणूजी माने यांनी केलेल्या शिफारसी नुसार पार्टी न. २ ला सदरील व्यापारी संकुलातील गाळा क्र.. ३ वापरण्याचा परवाना अकोला मनपा ने काही शर्ती व अटीवर मंजुर केला आहे. त्या पुढील प्रमाणे आहेत.

Scanned with CamScanner

३

१. सदरील व्यापारी संकुलातील गाळा क्र. ३ वापरण्याचा परवाना महानगरपालिका, अकोला पक्ष क्र. १ ने पक्ष क्र.२ ला तीस वर्षांच्या मुदतीकरीता मंजुर केला आहे.

२. सदरील व्यापारी संकुलातील दुकानाचा परवाना देण्याचा अधिकार महानगरपालिका अकोलास असून परवाना धारक पक्ष क्र. २ त्यांचे प्रतिनिधी किंवा वारसांना परवाना शुल्क अदा करून दुकानाचा वापर निश्चिक कालावधी करता येईल.

३. पक्ष क्र. २ ला मंजुर करण्यात आलेल्या गाळ्याचे क्षेत्रफळ . १५० चौ. फुटाचे असून, पक्ष क्र. २ ने पक्ष क्र. १ ला २ रू. (दोन रू.) प्रती चौ. फुटाप्रमाणे गाळ्याच्या संपुर्ण क्षेत्रफळाइतके परवाना शुल्क पक्ष क्र. १ला प्रतीमाह अदा करावे लागेल.

४. पक्ष क्र. २ ने पक्ष क्र. १ मनपा चा कर तसेच लागु असलेले इतर सर्व कर देणे या करारनाम्यानुसार बंधनकारक राहील.

५. विकासक आणि पक्ष क्र. १ यांच्यातील करारनाम्यानुसार पक्ष क्र. २ ला सुरूवातीचे एक वर्ष पर्यंत परवाना शुल्क भरावे लागणार नाही. परंतु मनपा., चे सर्व कर गाळा ताब्यात आल्यापासून कराराच्या कालावधी संपे पर्यंत देणे बंधणकारक राहील.

६. संपुर्ण कराराच्या एकूण ३० वर्षाच्या कालावधीत प्रत्येक पाच वर्षांनी परवाना शुल्क १०% ने वाढविण्याचे अधिकार पक्ष क्र. १ ला असेल आणि तो पक्ष क्र.२ वर बंधनकारक राहील.

७. कराराच्या एकुण ३० वर्षाचा कालावधी संपल्यानंतर नुतनीकरण करण्याचे तसेच बदलत्या परिस्थितीनुसार परवाना शुल्क वाढविण्याचा अधिकार पक्ष क्र.१ला पुर्णपणे राहील. असे या करारनाम्यानुसार ठरले आहे.

८. सदरील व्यापारी संकुलातील गाळा पक्ष क्र. १ ला दिनांक १/१२/०२ रोजी सोपविण्यात आला त्या तारखेपासून परवाना ३० (तिस) वर्षापर्यंत असेल.

९. पक्ष क्र. २ला आपला परवाना इतर व्यक्तींकडे हस्तांतरीत करावयाचा असल्यास त्या करीता पक्ष क्र. १ ची पुर्व परवानगी आवश्यक राहील. सदर परवनगी खालील प्रमाणे शुल्क आकारून दिली जाईल.

**अ)** परवानाधारकांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी इत्यादी कडे परवाना हस्तातंरीत करावयाच्या असल्यास रू. १०,०००/- (रू. दहाहजार ) पक्ष क्र. १ कडे जमा करून हस्तांतरीत करता येईल. परंतु कराराच्या कालावधीत परवाना धारकाचा मृत्यु झाल्यास त्यांच्या वर उल्लेखीत वारसाकडे कुठलीही हस्तांतरण फी न आकारता हस्तांतरण करता येईल.

**ब)** परवानाधारकाच्या कुटुंबातील व्यक्ती पत्नी, मुले इत्यादी सोडून इतर व्यक्तीकडे परवाना हस्तांतरीत करावयाचा असल्यास रू. २०,०००/- (रू. विसहजार) हस्तांतरण शुल्क पक्ष क्र. १ कडे जमा करून तशी परवानगी घेणे पक्ष क्र.२वर बंधनकारक राहील.

१०. सदरील व्यापारी संकुलातील गाळ्याचा परवाना मिळतेवेळी त्यासाठी आवश्यक ते शुल्क जसे स्टॅम्पस् पेपर्स, टंकलेखन, नोंदणी शुल्क इत्यादी वहन करण्याची संपुर्ण जवाबदारी पक्ष क्र. २ वर राहील.

११. सदरील व्यापारी संकुलातील सर्व परवाना धारकांनी इमारतीच्या देखरेखीसाठी एक नोंदणीकृत देखरेख समिती स्थापुन इमारतीच्या निगराणी करीता चौकीदाराची नेमणुक करून इमारतीची साफसफाई, दिवाबत्ती दुरूस्ती,

Scanned with CamScanner

पाणी व्यवस्था इत्यादी करीता विकासकाने परवाना धारकाकडून रू. १०,०००/- (रू. दहाहजार फक्त) किंवा रू.पये ५० (रू. पन्नास) प्रती चौ. फुटाप्रमाणे गाळयाच्या क्षेत्रफळाइतके शुल्क परवाना धारकाकडून आकारून ते राष्ट्रीयकृत बँकेत देखरेख समितीच्या नावे कायम अग्रीम धन ठेऊन त्यावर मिळणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून इमारतीचा देखरेख खर्च चालवावा. त्यापेक्षा जास्त रक्कमेची आवश्यकता भासल्यास सर्व परवाना धारकाकडून सारख्या प्रमाणात रक्कम परवाना धारकाकडून जमा करावी.

१२. पक्ष क्र. २ ला आपल्या गाळयाचा वापर मद्य विक्री किंवा इतर गैरकायदेशीर कामाकरीता येणार नाही.

१३. पक्ष क्र.२ला आपल्या गाळयाचा आकार बदलता येणार नाही. तसेच आपली हद्द वाढविता येणार नाही तसेच बोर्डाची जागा बदलता येणार नाही.

१४. व्यापारी संकुलातील संपुर्ण इमारत त्यातील इतर साहीत्य जसे इलेक्ट्रीक कनेक्शन व फीटींग, हातपंप, नळ कनेक्शन इत्यादी पक्ष क्र. १च्या मालकीचे असून पक्ष क्र. २ला त्यातील गाळा केवळ परवान्याच्या कालावधी पर्यंत वापरता येईल.

१५. व्यापारी संकुलाच्या संपुर्ण जमीनीचा आणि त्यावरील इमल्याचा ताबा हा नेहमी करीता पक्ष क्र.१ चा राहील.

१६. पक्ष क्र. १ ला कोणताही फलक व्यापारी संकुलाच्या संपुर्ण इमारतीत व इमारतीवर लावण्याचा अधिकार असेल. परंतु पक्ष क्र. २ ला मात्र व्यापारी संकुलात इतरत्र कोणतेही ठिकाणी महानगरपालिकेच्या (पक्ष क्र. १च्या) परवानगीशिवाय फलक लावता येणार नाही.

१७. पक्ष क्र. २ ने आपल्याला मंजुर झालेल्या गाळयाकरीता स्वतंत्र विज कनेक्शन (मिटर) घ्यावे आणि त्याचे देयक स्वतः अदा करावे.

१८. पक्ष क्र. २ ला व्यापारी संकुलाच्या गच्चीवर कोणत्याही प्रकारे अधिकार असणार नाही. परंतू पक्ष क्र. १ला मात्र गच्चीवर अधिकार असून त्यावर बांधकाम करण्याचा अधिकार राहील.

१९. परवाना शुल्काची रक्कम ६ (सहा) महिण्यापेक्षा जास्त अधिक कालावधी करीता थकीत झाल्यास सदर परवाना रद्द करण्याचा अधिकार पक्ष क्र. १ला असेल.

सदरील कराराच्या अटीनुसार पक्ष क्र. १ आणि पक्ष क्र. २ आज दिनांक 24/12/03 रोजी अकोला येथे कराराच अटी समजुन घेऊन मान्य झाल्याने साक्षीदारा समक्ष स्वंसमतीने स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक :

पक्ष क्र. १ ........ 24/12/2003

**आयुक्त**

**महानगरपालिका, अको**

साक्षीदार

१. ...............

२. ...............

पक्ष क्र. २ ...............

Scanned with CamScanner

प्रति,

मा० आयुक्त साहेब
महानगर पालिका, अकोला

(६)

विषय :- करारनामा करून देणे बाबत.

अर्जदार :- डॉ० नजीर डॉ० गफ्फार

महोदय,

मी खालील सही करणार अर्ज करतो की; अकोट रोड वरील महानगर पालीकाने विकास प्रल्हाद शॉपींग सेंटर ह्यामधे शीट नं. ३८ प्लॉट नं. K 64 दुकान नं. 3 असुन हे मी कंत्राटदार श्री चंद्रमणी गेंडुजी माने ह्याचे कडुन घेतली आहे. करिता सदरहू दुकानाच्या करारनामा माझे नांवे करून देण्यांत यावे हि विनंती.

सही

Nhilah

(डॉ. नजीर डॉ. गफार)

(५)

(अलॉटमेंट लेटर)

जा.क्र.अमनपा/बाजार/११०६/०५
अकोला महानगरपालिका अकोला
दिनांक : २१/४/२००५

# आदेश

अकोला महानगरपालिका हद्दीतील अशोक नगर भागातील प्लॉट क्र. के.६४ शिट क्र. ४८ अकोला येथील जागेत व्यापारी संकुल उभारण्याचे कंत्राट तत्कालीन न.प.ने विकासक श्री. चंद्रमणी गेणुजी माने रा. अकोला या विकासकाला दिले होते. त्या संदर्भात नगर परिषदेने सदरील व्यापारी संकुल उभारते वेळी विकासक श्री. चंद्रमणी गेणुजी माने आणि तत्कालीन नगर परिषद अकोला यांच्यात झालेल्या दिनांक १५ जानेवारी २००१ च्या करारानूसार शिफारस केलेल्या व्यापा-यांना न.प.ने आवश्यक परवाना शुल्क आकारून निश्चित अटी व शर्तीवर सदरील दुकाने निश्चित कालावधी करीता वापरावयास दयावयाचे ठरले आहे.

विकासक श्री. चंद्रमणी गेणूजी माने यांनी केलेल्या शिफारशीनूसार करारनाम्यातील पार्टी क्र.२ श्री. शे नजीर शे गफार रा अकोला यांना सोबत जोडलेल्या करारनाम्यातील शर्ती व अटीवर सदरील व्यापारी संकुलामधील दुकान नं --३------ दिनांक १.१२.०२ पासून ३० वर्षापर्यत परवाना मंजुर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांचे मान्यतेने.

(सही) २१.४.०५
उपायुक्त(वि)
महानगरपालिका अकोला

प्रतिलीपी,
१) शे. नजीर शे. गफफार

Scanned with CamScanner

(6)

प्रती,

मा. आयुक्त साहेब
महानगर पालीका अकोला.

विषय:- विलास प्रल्हाद शॉपींग सेंटर
दु. क्रं. 3 देणे बाबत

महोदय

आपणांस कळविण्यात येते की; अकोट रोड वरील विलास शॉपींग सेंटर ह्यामधील दुकान क्रं. 3 (तीन) नामे डॉ. नजीर डॉ. गफ्फार ह्यांना दिलेले आहे. करिता आपले माहितीस्तव सादर. हि विनंती.

आपला

Cmone

(श्री चंद्रमणी गेबुजी माने)
ठेकेदार (B.O.T.)

Scanned with CamScanner

6

(अलॉटमेंट लेटर)

जा.क्र.अमनपा/बाजार/११०/०५
अकोला महानगरपालिका अकोला
दिनांक : 29/8/2005

# आदेश

अकोला महानगरपालिका हद्दीतील अशोक नगर भागातील प्लॉट क्र. के.६४ शिट क्र. ४८ अकोला येथील जागेत व्यापारी संकुल उभारण्याचे कंत्राट तत्कालीन न.प.ने विकासक श्री. चंद्रमणी गेणुजी माने रा. अकोला या विकासकाला दिले होते. त्या संदर्भात नगर परिषदेने सदरील व्यापारी संकुल उभारते वेळी विकासक श्री. चंद्रमणी गेणुजी माने आणि तत्कालीन नगर परिषद अकोला यांच्यात झालेल्या दिनांक १५ जानेवारी २००१ च्या करारानूसार शिफारस केलेल्या व्यापा-यांना न.प.ने आवश्यक परवाना शुल्क आकारून निश्चित अटी व शर्तीवर सदरील दुकाने निश्चित कालावधी करीता वापरावयास दयावयाचे ठरले आहे.

विकासक श्री. चंद्रमणी गेणूजी माने यांनी केलेल्या शिफारशीनूसार करारनाम्यातील पार्टी क्र.२ श्री. शे नजीर शे गफार रा अकोला यांना सोबत जोडलेल्या करारनाम्यातील शर्ती व अटीवर सदरील व्यापारी संकुलामधील दुकान नं 3 दिनांक १.१२.०२ पासून ३० वर्षापर्यत परवाना मंजुर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांचे मान्यतेने.

21.4.05
उपायुक्त(वि)
महानगरपालिका अकोला

कार्यालय प्रत

प्रतिलीपी,
१)-शे. नजीर शे. गफ्फार

Scanned with CamScanner